श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-७, अंक-५ | मे-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४ |

## वालावलकर हॉस्पिटलमध्ये बालक मेळावा

दि. ३१ मार्च २०१९ रोजी भ. क. ल. वालावलकर हॉस्पिटलमध्ये बालक मेळावा साजरा झाला. या मेळाव्याचे विशेष आकर्षण म्हणजे सन २०१६ पासून वालावलकर हॉस्पिटलमध्ये जन्माला आलेल्या सर्व बाळांची संपूर्ण तपासणी करण्यात आली. रत्नागिरी जिल्ह्यातील विविध तालुक्यातून सुमारे ४५० पालक आपल्या मुलांसमवेत या मेळाव्यात सहभागी झाले. चिपळूण तालुक्यातून कळबंट, दहिवली, सावर्डे, डेरवण, कोसबी, धामेली, नांदगाव, आगवे, वहाळ, काजरकोंड, हडकणी तसेच संगमेश्वर तालुक्यातून धामापूर, सरंद, माखजन, आरवली; गुहागर तालुक्यातून पडवे, रामपूर, गुहागर या सर्व गावातून मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात सहभागी मुले ०-६ वयोगटातील होती. सर्व सहभागी मुलांची बालरोगतज्ज्ञांनी तपासणी केली व लसीकरण आणि त्याचे महत्त्व सांगण्यात आले. बालरोगतज्ज्ञ व अस्थिरोगतज्ज्ञांनी मुडदूस, रक्तक्षय आजाराचे निदान व उपचार केले. दंतचिकित्सकांनी दुधाचे दात आणि मौखिक स्वच्छता यांचे महत्त्व सांगितले आणि दात तपासले. आहार शास्त्रज्ञांनी वाढत्या वयातील योग्य आहाराचे महत्त्व समजावून सांगितले आणि पालकांना त्यांच्या मुलांसाठी त्यांच्या दैनंदिन आहाराच्या पद्धतीविषयी सल्ला दिला. सर्व मुलांना मोफत औषधवाटप करण्यात आले व सहभागी झाल्याबद्दल बक्षीस म्हणून ड्रेसचे, लहान मुलींना फ्रॉक व मुलांना शर्ट व पॅन्टचे मोफत वाटप करण्यात आले.




*उजवीकडून सिस्टर महाडीक, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. बसवराज हांजगे, डॉ. लटपटे, डॉ. शुक्ला, आणि डाव्या कोपऱ्यात डॉ. नाडकर्णी*

# आता दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी बालकांसाठी किडनीरोगतज्ज्ञांची भेट

आता बी. के. एल. वालावलकर हॉस्पिटलमध्ये प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी पीडियाट्रिक ओ. पी. डी. विभागात खास बालकांसाठी किडनीरोगतज्ज्ञ भेट देतील. हे तज्ज्ञ डॉक्टर्स हाता-पायाला तसेच चेहऱ्याला सूज येणे, हिमोग्लोबिन कमी असणे, उच्च रक्तदाब, मुतखडे, आवर्ती मूत्र संक्रमण, बेडवेटिंग, मूत्रपिंड जन्मजात दोष, किडनी रोग, मूत्रपिंड अपयश, मूत्रपिंड किंवा मूत्रमार्गात पसरणारे रोग, मूत्रपिंड समस्या, मूत्रपिंड दगड आदी समस्यांबाबत उपचार करतील. या महिन्यात दि. २१ एप्रिलला डॉ. किरण साठे आणि डॉ. वैभव केसर यांनी हॉस्पिटलला भेट दिली आणि लहान मुलांच्या विकारांवर उपचार केले. पुढील महिन्यात डॉ. प्रीती शानभाग आणि डॉ. पवन देवूर रविवार, दि. १९ मे २०१९ रोजी भेट देणार आहेत.



*उजवीकडून डॉ. किरण साठे, डॉ. सुवर्णा पाटील आणि डॉ. वैभव केसकर*

# बौद्धिक संपदा या विषयावर प्रा. गणेश हिंगमिरे यांचे व्याख्यान

प्रा. गणेश हिंगमिरे हे जी.एम.जी.सी. (GMGC) येथे संस्थापक व अध्यक्ष आहेत. ते 'बौद्धिक संपदा' (Intellectual property) या विषयासाठी भारताच्या वाणिज्य मंत्रालयाकडून दोनदा (सन २०१५ आणि २०१६) राष्ट्रीय पुरस्काराचे विजेते आहेत. ते विश्वस्त व्यवस्थापक व पेटंट, ट्रेड मार्क, कॉपीराइट आणि जी.आय. (जिऑग्राफिक इंडेक्स), डब्ल्यूटीओ (वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन), 'पेटंट-लॉ' आदी विषयात जागतिक स्तरावरचे तज्ज्ञ, अशी त्यांची ओळख आहे. दि. २९ मार्च २०१९ रोजी बी.के.एल.वालावलकर हॉस्पिटलमध्ये प्रा. गणेश हिंगमिरे यांनी रुग्णालयातील डॉक्टर्स, मेडिकल कॉलेज मधील प्राध्यापक, विद्यार्थी आदींसमोर पेटंट, ट्रेड मार्क, कॉपीराइट, अभियोजना, शोध आणि संशोधन यासह बौद्धिक संपदा (इंटलेक्चुअल प्रॉपर्टी) या विषयावर बहुमोल माहिती दिली. तरुण मुलांना पेटंट, बौद्धिक संपदा (इंटलेक्चुअल प्रॉपर्टी) या विषयामध्ये अभ्यास करण्याचे आणि काम करण्याचे आवाहन केले. बौद्धिक संपदा हेच देशचे सामर्थ्य व भारताचा आंतरराष्ट्रीय सन्मान वाढविणारे आहे असे प्रा. गणेश हिंगमिरे यांनी प्रतिपादन केले.



*डॉ. हिंगमिरे यांचे मार्गदर्शन*

# तज्ज्ञ डॉक्टरांची भेट

दि. २० एप्रिल २०१९ रोजी डॉ. अनिरुद्ध कुलकर्णी (इंटरव्हेन्शनल रेडीऑलॉजिस्ट), डॉ. भावेश पोपट (इंटरव्हेन्शनल रेडीऑलॉजिस्ट) आणि डॉ. सचिन विलेकर (मधुमेह फुट सर्जन) यांनी बी.के. वालावलकर हॉस्पिटलला भेट दिली. या वेळी वेरिकोस व्हेन, पेरिफिरी वॅसकुलर डिसिज, डायबेटिक फूट या रूग्णांची तपासणी केली. यावेळी लोअर लिप डॉपलर आणि सीटी एंजियोग्राफी देखील करण्यात आले. त्याचप्रमाणे हे डॉक्टर दि. १८ मे २०१९ रोजी पुन्हा भेट देणार आहेत. हे तीनही डॉक्टर्स रक्तवाहिन्यांचे तज्ज्ञ तसेच 'डायबेटिक फूट'चे तज्ज्ञ आहेत.



*डॉ. अनिरूद्ध कुलकर्णी, डॉ. भावेश पोपट आणि डॉ. सचिन विलेकर (मधुमेह फुट सर्जन)*

# डेरवण शाळेत अटल टिंकरींग लॅबमध्ये ‘कम्युनिटी डे’ साजरा

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ‘अटल इनोव्हेशन मिशन’ अंतर्गत अटल टिंकरींग लॅब (एटीएल) ही एक अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांच्या क्रियाशीलतेला, कल्पकतेला चालना मिळावी, त्यांच्यात जिज्ञासू वृत्ती वाढावी व नवनिर्मितीची क्षमता विकसित व्हावी ही उद्दिष्टे ठेवून विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.



डेरवण इंग्रजी माध्यम शाळा ही ‘एटीएल’ असलेली विज्ञान केंद्र शाळा असून या शाळेतील व परिसरातील शाळांमधील विद्यार्थ्यांना २१ व्या शतकात प्रगती करण्यासाठी आवश्यक शास्त्रीय उपकरणे हाताळण्याची व वैज्ञानिक कौशल्ये विकसित करण्याची जबाबदारी केंद्रशासनाने या शाळेवर सोपविली आहे.

डेरवण येथील ‘एटीएल’मार्फत विविध वैज्ञानिक उपक्रमांनी भरगच्च असा ‘कम्युनिटी डे’ नुकताच साजरा करण्यात आला. यात १४६ विद्यार्थी, ३५ पालक व ३२ शिक्षक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. शिक्षण व्यवस्थेतील तीन महत्त्वपूर्ण घटक म्हणजे विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचा समन्वय साधून एकत्र उपक्रम करून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे हे ‘कम्युनिटी डे’ च्या आयोजनाचे उद्दिष्ट होते.

विद्यार्थ्यांचा लहान गट, मोठा गट व पालकांचा गट अशी गटनिहाय आखणी करून प्रत्येक गटाला योग्य अशा उपक्रमांचे आयोजन केले होते. सकाळ सत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या लहान गटाला बलून ट्रेन (फुग्यांपासून विविध रचना), अभियांत्रिकी अनुभव देण्यासाठी वृत्तपत्रापासून पूल तयार करणे, सौरऊर्जेवर चालणारे रोबो उदा. गाडी, सरडा, पवनचक्की हे क्रियाकलाप घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मोठ्या गटाला व्हायब्रेशन डिटेक्टर, इझी ऑप्टीक्स, सोल्डरींग, आर्किमेडीसचे तत्त्व, थ्री डी प्रिंटर, यांत्रिक साधनांचे कार्य हे उपक्रम घेण्यात आले. तसेच पालकांना थ्री डी प्रिंटरची कार्यपद्धती समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांनी ‘हेल्थ पार्क’ या शरीरविज्ञान प्रदर्शनाला भेट दिली. विद्यार्थ्यांनी मानवी शरीराशी निगडीत असे हृदयाचे ठोके मोजणे, रक्तदाब तपासणे, उंची-वजन प्रमाण तपासणे असे विविध प्रयोग स्वत: करून बघितले. विविध विकार व ते टाळण्यासाठी आहार, अंधश्रद्धा आणि त्यामागील वैज्ञानिक सत्ये, सण साजरे करण्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन, फास्ट फूड, संगणक - मोबाईलच्या अति वापरामुळे होणारे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना सोदाहरण स्पष्ट करण्यात आले. अशाप्रकारे हेल्थ पार्कला भेट देणे अत्यंत उपयुक्त ठरले.



या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांबरोबर पालकांनीदेखील उत्साहाने सहभाग घेतला. या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमधील नवनिर्मितीची वृत्ती, अभ्यास, चिकाटी, सहकार्य भावना हे गुण वाढीस लागतील असा अभिप्राय पालकांनी दिला. संपूर्ण दिवस उपक्रमांनी भरलेला असल्याने विद्यार्थ्यांनी सर्व उपक्रमात रस घेऊन, कुतूहल जागवून, स्वयंप्रेरणेने ज्ञानार्जन करत नवनिर्मितीचा आनंद घेतला.

# ‘एसव्हीजेसीटी’ क्रीडासंकुलात ‘ॲक्शन स्पोर्ट्स’ चे उन्हाळी शिबिर संपन्न

मुंबई येथील ‘ॲक्शन स्पार्ट्स अकॅडमी’चे उन्हाळी प्रशिक्षण शिबिर दि. १७ ते २१ एप्रिल २०१९ दरम्यान डेरवण येथे झाले. या प्रशिक्षणासाठी एकूण २५ मुलांचा समावेश होता. यामध्ये राज्य तसेच अनेक राष्ट्रीय खेळाडूंचाही सहभाग होता. संकुलातील अंतरराष्ट्रीय दर्जाच्या मैदानावर सराव हे या प्रशिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे प्रशिक्षक धनलक्ष्मी यांनी सांगितले. या मैदानावरील सराव मुलांना येणाऱ्या स्पर्धांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो आणि येथील स्वच्छ व प्रसन्न वातावरणात मुलांना सरावाचा एक वेगळाच हुरूप येतो असेही त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर मुलांनी क्रीडासंकुलातील स्विमिंग व अन्य साहसी खेळांचाही मनमुराद आनंद घेतला.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# क्रीडासंकुलामार्फत उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही 'एसव्हीजेसीटी' क्रीडासंकुलामार्फत दि. २ मे ते ६ मे २०१९ दरम्यान उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये मुलांना मैदानी खेळ, फुटबॉल, शूटिंग, धनुर्विद्या, स्विमिंग, बॅडमिंटन या खेळाच्या तंत्रशुद्ध प्रशिक्षणाबरोबरच वॉल क्लायम्बिंग, रिव्हर क्रॉसिंग, चॅलेंज कोर्स या साहसी खेळांचा समावेश करण्यात आला आले. हे प्रशिक्षण शिबिर हे निवासी व अनिवासी स्वरूपात भरविण्यात येणार असून अधिकाधिक मुलांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन क्रीडासंकुलामार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी – ९८२२६३९३०६/९३२५८९७८७७/९८९०१२१२८८/८२०८३८८४२६ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क करावा.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून मे २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ११ मे २०१९ | डॉ. सतेज सबनिस (युरोलॉजिस्ट), मुंबई | मुत्रमार्गातील मुतखड्यावरील दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया |
| ११ मे २०१९ | श्रवण यंत्र व वाचा-उच्चार तज्ज्ञ | बहिरेपणाचे मशीन व स्पीच थेरपीस्ट |
| १२ मे २०१९ | डॉ. शिवप्रसाद दाते (प्लास्टीक सर्जन), मुंबई | प्लास्टीक सर्जरी व उपचार |
| १८ मे २०१९ | टाटा हॉस्पिटलचे डॉक्टर्स, (कॅन्सर तज्ज्ञ), मुंबई | कॅन्सर तपासणी व उपचार |
| १८ मे २०१९ | डॉ. श्रीपाद बाणावली (कर्करोग तज्ज्ञ), मुंबई | कॅन्सर तपासणी व उपचार |
| १८ मे २०१९ | डॉ. सचिन विलेकर (डायबेटीक तज्ज्ञ), मुंबई | डायबेटीक फुट तपासणी व उपचार |
| १८ मे २०१९ | डॉ. अनिरुध्द कुलकर्णी (रेडीऑलॉजिस्ट) | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| | डॉ. भावेश पोपट (रेडीऑलॉजिस्ट) | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| १८ मे २०१९ | डॉ. सुजाता नाईक (होमीओपॅथी), मुंबई | त्वचारोग व गुप्तरोग तपासणी व उपचार |
| १९ मे २०१९ | डॉ.संजय ओक (बालरोग तज्ज्ञ), मुंबई | लहान मुलाच्या आजारावरील सर्व शस्त्रक्रिया व उपचार |
| १९ मे २०१९ | डॉ. प्रिती शानबाग (पिडीयाट्रीक नेफ्रॉलॉजिस्ट), मुंबई | लहान मुलांचे किडनी आजार व उपचार |
| १९ मे २०१९ | डॉ. पवन देवरे (पिडीयाट्रीक नेफ्रॉलॉजिस्ट), मुंबई | लहान मुलांचे किडनी आजार व उपचार |
| २३ मे २०१९ | डॉ. अच्युत जोशी (नेफ्रॉलॉजिस्ट), पुणे | किडनी आजार व उपचार |
| २३ मे २०१९ | डॉ. के. एस. कुलकर्णी (मानसोपचार तज्ज्ञ), पुणे | मानसोपचार निदान व उपचार |
| | डॉ. आनंद जोशी (गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट), मुंबई | पचनसंस्थेची तपासणी व उपचार |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व ३.०० नंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी वाचा-उच्चार तज्ज्ञ डॉ. विशाखा या वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०